नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २७६ | Issue - 276 | वार बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ | Blow- Wednesday Date 25 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# अहिल्यानगरमध्ये कार आणि मालवाहू ट्रकचा भीषण अपघात, एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

## दोन जण गंभीर जखमी; ओव्हरटेक करताना श्रीरामपूर संगमनेर रस्त्यावर घडली दुर्घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिह्यात धक्कादायक घटना घडली आहे. जिल्ह्यातील श्रीरामपूर संगमनेर रस्त्यावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात एकाच कुटुंबातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा गा–वाजवळ कार आणि मालवाहू ट्रकचा अपघात झाला आहे.

कारमधील सहा प्रवाशांचा जागीच मृत्यू तर दोनजण गंभीर जखमी

श्रीरामपूर संगमनेर रस्त्यावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात श्रीरामपूर येथील सहा जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. कारमधील पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू तर दोनजण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. मृतांमध्ये दोन महिला, एक पुरुष आणि दोन लहान बालकांचा समावेश आहे. या भीषण अपघातात श्रीरामपूर येथील एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

कालच श्रीगोंदा तालुक्यात झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाला होता

कालच अहिल्यानगरच्या श्रीगोंदा तालुक्यातील घारगाव – कोळगाव रोडवरील माऊली मंदिरा जवळ भीषण अपघात झाला होता. ट्रक आणि इको कारची समोरा –समोर धडक झाल्याने चार जणांचा जागीच मृत्यू झाला होता. तर एक लहान मुलगा गंभीर जखमी झाला होता. मृतांमध्ये चालकासह एकाच कुटुंबातील तिघांचा समावेश आहे. काल पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाल्याची माहिती आहे.. नितीन कोकाटे (कारचालक), गजानन पायघन, ध्रुपता पायघन, वैभव पायघन अशी मयत व्यक्तींची नावे आहेत तर करण पायघन या तेरा वर्षीय मुलावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ट्रक ड्रायव्हर फरार झाला असून बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा गावाजवळ सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला आहे. कार आणि मालवाहू ट्रॅकचा अपघातात जीवितहानीसह कार चक्काचूर झाली आहे. अपघातात एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू तर ६ वर्षीय चिमुकल्याची मूत्यूशी झुंज सुरु आहे. कारमधील ४ प्रवाशांचा जागीच तर उपचारा दरम्यान दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये २४ वर्षीय प्रशांत चव्हाण ,४० वर्षीय संगीता चव्हाण, १६ वर्षीय सिद्धार्थ चव्हाण, ३० वर्षीय सारिका चव्हाण, ३ वर्षीय ऋत्वी चव्हाण आणि २६ वर्षीय ऐश्वर्या चव्हाण यांचा समावेश आहे.

६ वर्षीय रुद्र चव्हाण गंभीर जखमी झाल्याने त्यावर लोणी येथील प्रवरा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १० दिवसांपूर्वी गाडी घेतल्याने खंडाळा येथे पावन गणपतीच्या दर्शनाला चालले होते चव्हाण कुटुंब. ओव्हरटेक करताना माल वाहतूक ट्रकला समोरुन धडक दिल्याने भीषण अपघात झाला आहे.



# अन्यथा जून महिन्यात पुन्हा उपोषणला बसणार, मनोज जरांगे यांचा सरकारला इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला पुन्हा उपोषणाचा इशारा दिला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या शासन निर्णयानंतर मराठा कुणबी प्रमाणपत्राला हवी तशी गती मिळाली नव्हती. त्यामुळे राज्य सरकारने याबाबतची कार्यपद्धत निश्चित करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. सरकारच्या या कार्यवाहीवर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. सरकारने हे आधीच करायचं होतं. इतके दिवस समाजाचा झळ का करायचा? गोरगरिबांच्या नोकऱ्यांचा प्रश्न राहतो. गोरगरिबांच्या जीवनाशी आणि भावनेशी सरकारने खरंच खेळायला नको. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या मनाने जीआर काढला ना, त्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचादेखील पाठिंबा आहे. मग तुम्ही अडवणूक का करायची?, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

मराठवाड्याचा मराठा कुणबी आहे आणि हैदराबाद गॅझेटियरचा जीआर तुम्ही काढलाय, तर अडवणूक कशाला करायची? मला वाटलं निवडणुकीचा काळ आहे, त्यांच्याकडून झालं असेल. ७० ते ८० वर्षे आरक्षण नव्हतं. आणखी एक वर्षाने नाही मिळालं तरी काही हरकत नाही. दमाने घेऊ. पण तुम्ही कार्यपद्धतीसाठी आता सहा महिन्याने नियुक्ती करत आहात. मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर मराठा समाजाने कधीही न टाकलेला विश्वास आता प्रचंड टाकला आहे. कारण त्यांनी जीआर काढला की, मराठवाड्यातील मराठा १०० टक्के आरक्षणात जाणार. हा जो विश्वास टाकला आहे त्याचा गैरविश्वास विखे पाटील यांनी होऊ देऊ नये. ही आमची प्रामाणिक इच्छा आहे, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली.



आता नाईलाज आहे. मला सरकार गरजेचं नाही. मला मंत्री गरजेचा नाही. मला माझा समाज गरजेचा आहे. मी ऐकायचं तोपर्यंत ऐकेन. तुम्ही नेहमी असं करत राहीले, जाणूनबुजून प्रमाणपत्र देत नाहीत. नोंदी सापडल्या असूनही कुणबी प्रमाणपत्र दिले जात नाही. का दिले जात नाहीत? सरकारपेक्षा अधिकारी मोठे झाले आहेत का? जाणूनबुजून का अडवणूक केली जाते?, असे प्रश्न मनोज जरांगे यांनी उपस्थित केले.

हे जाणूनबुडून मराठा समाजाचं पिळवणूक करण्याचं काम सुरु आहे. मराठ्यांच्या भविष्याशी खेळण्याचं काम सरकार करत आहे. या पुढच्या काळात त्यांनी असं काम करु नये. नाहीतर मला नाईलाजाने जून महिन्यात उपोषणाला बसावं लागेल. कारण जून महिलांचे शाळा, महाविद्यालयांचे प्रवेश असतात. सरकार विनाकारण वाटोळं करणार असेल तर मी ऐकणार नाही. एकाही मंत्र्याचं ऐकून सुद्धा घेणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

सगळ्या केसेस मागे घेऊ, असं सरकार म्हणालं होतं. पण अजून केसेस मागे घेतलेले नाहीत. सार्थीच्या शिष्यवृत्ती मुलांना मिळत नाहीयत. परदेशात गेलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी आहे. महामंडळाचे परतावे थांबले आहेत. या अडचणी तुम्हला तातडीने करुन घ्यावे लागतील. सातारा गॅझेटियरचा जीआर कधी काढणार? आम्ही किती दिवस थांबायचं? सहा महिन्यांपासून थांबलो आहे. माझी सहनशीलता संपू देऊ नका, असा मोठा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

# ‘उद्या बारामतीत जाऊन एफआयआर करणार’; व्हीएसआरवर गुन्हा दाखल करण्यावर रोहित पवार ठाम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेनंतर राज्यातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. डीजीसीएने संबंधित व्हीएसआर कंपनीची उड्डाणे तात्पुरती बंद केल्यानंतर आता या प्रकरणात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यासंबंधी मोठ्या प्रमाणात आता भूमिका घेतली जात आहे. आमदार रोहित पवार यांनी याच मागणीसाठी थेट उद्या बारामती तालुका पोलीस ठाण्यात व्ही एस आर कंपनी विरोधात तक्रार देणार आहेत, अशी माहिती दिली आहे. आज त्यांनी मुंबईतील मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यामध्ये संबंधित विमान कंपनीवर गुन्हा दाखल करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला.



अजित पवारांचा विमान अपघात

२८ जानेवारी रोजी मुंबईहून बारामतीकडे येत असताना बारामती विमानतळाच्या धावपट्टीलगत अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला. या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला आणि संपूर्ण महाराष्ट्र शोकमग्न झाला. घटनेनंतर अपघात की घातपात, याबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली होती. अधिकृत तपासाबाबत स्पष्ट माहिती न मिळाल्याने जनतेत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. याच पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी स्वतंत्र पातळीवर तांत्रिक माहिती गोळा करत तपासाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दिल्ली आणि मुंबई येथे घेतलेल्या पत्रकार परिषदांमधून त्यांनी या प्रकरणातील कथित त्रुटी आणि विसंगती मांडल्या. त्यांच्या मते ही केवळ दुर्घटना नसून घातपाताची शक्यता नाकारता येत नाही.

फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी

त्यानंतर यासर्व प्रकरणात मोठी घडामोड घडली ती म्हणजे डीजीसीएच्या विमान कंपनीवरील कारवाईची. त्यामुळे डीजीसीएने व्हीएसआर कंपनीच्या उड्डाणांवर बंदी घातल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. मात्र केवळ उड्डाणबंदी पुरेशी नसून संबंधित कंपनीवर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी भूमिका रोहित पवारांनी आणि इतर काही नेत्यांनीही घेतली आहे.

दुर्घटना ज्या हद्दीत घडली त्या बारामती तालुका पोलीस ठाण्यात जाऊन अधिकृत तक्रार दाखल करू, असा इशाराही रोहित पवारांनी दिला आहे. त्यामुळे आता या प्रकरणात पुढे काय घडते? पोलीस प्रशासन कोणती भूमिका घेते आणि तपासाची दिशा काय ठरते? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# मुलांच्या ऑनलाईन गेमच्या व्यसनावर सरकार गंभीर; तज्ज्ञ टास्क फोर्स स्थापन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात वाढत चाललेल्या मुलांच्या डिजिटल व्यसनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तज्ज्ञांची टास्क फोर्स स्थापन केली असून पुढील अधिवेशनाच्या आत सविस्तर अहवाल सादर केला जाईल, अशी माहिती राज्याचे माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी विधान परिषदेत दिली. विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे आणि संजय केणेकर यांनी लक्षवेधीद्वारे हा विषय उपस्थित केला होता. चर्चेत प्रविण दरेकर, चित्रा वाघ, भाई जगताप आणि उमा खापरे यांनी सहभाग घेतला. राज्यात १८ वर्षांखालील सुमारे चार कोटी मुले असून त्यापैकी जवळपास तीन कोटी मुले ही १५ वर्षांखालील आहेत. त्यामुळे डिजिटल व्यसन हा केवळ वैयक्तिक नव्हे तर सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे. गेमिंग ॲप्स, सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा, अल्पवयीनांसाठी जाहिरातींवर निर्बंध यांसारख्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. राज्य सरकारकडून २ फेब्रुवारी रोजी प्रधान सचिव विरेंद्र सिंह यांना लेखी आदेश देऊन तज्ज्ञ कार्यदल स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. या टास्क फोर्समध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, तंत्रज्ञान तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, डॉक्टर तसेच संबंधित विभागांचे अधिकारी असतील.

### ३ हजार ७१६ कोटी रुपयांचे घर जप्त

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर तपासाला वेग ; अंबानी पुन्हा ईडीसमोर हजर राहणार

# मनी लॉँड्रिंग प्रकरणी उद्योगपती अनिल अंबानींविरुद्ध ईडीची मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशातील आघाडीच्या उद्योगपतींपैकी एक असलेल्या अनिल अंबानी यांच्या अडचणीत वाढत असल्याचे दिसून येत आहे. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मनी लॉँड्रिंग प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. त्यांचे मुंबईतील आलिशान निवासस्थान ॲबोड जप्त केले आहे. अधिकाऱ्यांच्या मते, ही मालमत्ता अंदाजे ३७१६.८३ कोटींची आहे. ही कारवाई मनी लॉँड्रिंग विरोधी कायद्यांतर्गत करण्यात आली. ईडीने या संदर्भात तात्पुरते जप्तीचे आदेश जारी केले आहेत. सूत्रांच्या मते, हा आदेश अलीकडेच जारी करण्यात आला आहे. हा खटला अनिल अंबानी यांच्या कंपनी रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) शी संबंधित एका कथित बँक फसवणुकीच्या प्रकरणाशी संबंधित आहे.

मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) ईडी या प्रकरणाची चौकशी करत आहे. ॲबोड पाली हिलमध्ये आहे. ॲबोड नावाची ही आलिशान इमारत मुंबईच्या पाली हिल परिसरात आहे. ६६ मीटर उंच, १७ मजली इमारत देशातील सर्वात महागड्या खाजगी मालमत्तांपैकी एक मानली जाते. ईडीच्या मते, अनिल अंबानी आणि त्यांच्या समूह कंपन्यांविरुद्ध आतापर्यंत एकूण जप्तीची कारवाई १५००० कोटींपेक्षा जास्त झाली आहे.

या महिन्याच्या सुरुवातीला, सर्वोच्च न्यायालयाने ईडीला रिलायन्स कम्युनिकेशन्स, त्यांच्या मूळ कंपन्या आणि रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात बँक फसवणुकीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश दिले.



अनिल अंबानी देश सोडून जाणार नाहीत

सर्वोच्च न्यायालयाने अंबानी यांचे वकील मुकुल रोहतगी यांनी दिलेल्या आश्वासनाचाही संदर्भ दिला की त्यांचे अशिला देश सोडून जाणार नाहीत आणि तपासात कोणत्याही प्रकारे अडथळा येणार नाही.

६६ वर्षीय अनिल अंबानी यांची केंद्रीय तपास यंत्रणेकडून दुसऱ्यांदा चौकशी होण्याची शक्यता आहे. ते यापूर्वी ऑगस्ट २०२५ मध्ये ईडीसमोर हजर झाले होते, जिथे त्यांचे म्हणणे पीएमएलए अंतर्गत नोंदवण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ला कथित फसवणुकीत कोणतेही बँक अधिकारी सहभागी होते का याची चौकशी करण्याची जबाबदारी देखील सोपवली आहे.

तपास यंत्रणांच्या संथगतीबद्दल नाराजी

सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे की दोन्ही यंत्रणांच्या तपासाची गती मंदावली आहे. न्यायालयाने आता निष्पक्ष तपासाची आशा व्यक्त केली आहे आणि सीबीआय आणि ईडीला वेळोवेळी तपासाच्या प्रगतीबद्दल न्यायालयाला अपडेट करण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतीय आणि परदेशी बँकांकडून ४०००० कोटींपेक्षा जास्त कर्ज घेतले होते

सीबीआयच्या एफआयआरनंतर ईडीने गेल्या वर्षी या प्रकरणाची चौकशी सुरू केली. एफआयआरमध्ये अनिल अंबानी, आरकॉम आणि इतरांविरुद्ध फसवणूक, कट आणि भ्रष्टाचाराचा आरोप आहे. तपास आरकॉम आणि त्याच्या उपकंपन्यांवर केंद्रित आहे, ज्यांनी २०१० ते २०१२ दरम्यान भारतीय आणि परदेशी बँकांकडून ४०००० कोटींपेक्षा जास्त कर्ज घेतले होते. यापैकी पाच खात्यांना नंतर कर्ज देणाऱ्या बँकांनी फसवे घोषित केले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पुन्हा आंदोलनाचा एल्गार

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला पुन्हा उपोषणाचा इशारा दिला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या शासन निर्णयानंतर मराठा कुणबी प्रमाण-पत्राला हवी तशी गती मिळाली नव्हती. त्यामुळे राज्य सरकारने याबाबतची कार्यपद्धत निश्चित करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. सरकारच्या या कार्यवाहीवर म नोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. सरकारने हे आधीच करायचं होतं. इतके दिवस समाजाचा झळ का करायचा? गोरगरिबांच्या नोकऱ्यांचा प्रश्न राहतो. गोरगरिबांच्या जीवनाशी आणि भावनेशी सरकारने खरंच खेळायला नको. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या मनाने जीआर काढला ना, त्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचादेखील पाठिंबा आहे. मग तुम्ही अडवणूक का करायची?, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. मराठवाड्याचा मराठा कुणबी आहे आणि हैदराबाद गॅझेटियरचा जीआर तुम्ही काढलाय, तर अडवणूक कशाला करायची? मला वाटलं निवडणुकीचा काळ आहे, त्यांच्याकडून झालं असेल. ७० ते ८० वर्षे आरक्षण नव्हतं. आणखी एक वर्षाने नाही मिळालं तरी काही हरकत नाही. दमाने घेऊ. पण तुम्ही कार्यपद्धतीसाठी आता सहा महिन्याने नियुक्ती करत आहात. मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर मराठा समाजाने कधीही न टाकलेला विश्वास आता प्रचंड टाकला आहे. कारण त्यांनी जीआर काढला की, मराठवाड्यातील मराठा १०० टक्के आर-क्षणात जाणार. हा जो विश्वास टाकला आहे त्याचा गैरविश्वास विखे पाटील यांनी होऊ देऊ नये. ही आमची प्रामाणिक इच्छा आहे, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली. आता नाईलाज आहे. मला सरकार गरजेचं नाही. मला मंत्री गरजेचा नाही. मला माझा समाज गरजेचा आहे. मी ऐकायचं तोपर्यंत ऐकेन. तुम्ही नेहमी असं करत राहीले, जाणूनबुजून प्रमाणपत्र देत नाहीत. नोंदी सापडल्या असूनही कुणबी प्रम ाणपत्र दिले जात नाही. का दिले जात नाहीत? सरकारपेक्षा अधिकारी मोठे झाले आहेत का? जाणूनबुजून का अडवणूक केली जाते?, असे प्रश्न मनोज जरांगे यांनी उपस्थित केले. हे जाणूनबुडून मराठा समाजाचं पिळवणूक करण्याचं काम सुरु आहे. मराठ्यांच्या भविष्याशी खेळण्याचं काम सरकार करत आहे. या पुढच्या काळात त्यांनी असं काम करु नये. नाहीतर मला नाईलाजाने जून महिन्यात उपोषणाला बसावं लागेल. कारण जून महिलांचे शाळा, महाविद्यालयांचे प्रवेश असतात. सरकार विनाकारण वाटोळं करणार असेल तर मी ऐकणार नाही. एकाही मंत्र्याचं ऐकून सुद्धा घेणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

# मोटार वाहन टॅक्स भ्रष्टाचार प्रकरणी उपलोकायुक्तांकडून कारवाईचा बडगा!

## मोटार वाहन निरीक्षकांसह टंकलेखकांवर वेतन रोखण्याची कारवाई!

## राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद धुमाळ यांचे पाठपुरावा यशस्वी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे अंतर्गत येत असलेल्या नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी एकूण ८५० वाहनांच्या प्रकरणात ४.० या संगणक प्रणालीवर जुन्या वाहनांची एन्ट्री घेताना सीबीआर नोंदी अद्यावत न करता टॅक्स क्लिअरन्स अप्रुवल बिले म्हणून शासकीय महसूल हानी झाल्याचे निदर्शनास आल्याने मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला आणि लिपिक टंकलेखक मयूर हटकर व सुहास पवार यांचेवर वेतन रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे हा प्रकार चौकशीनिहाय अहवालामुळे उघड झाल्याने परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे.

सविस्तर वृत्त असे की, परिवहन जुन्या वाहनांची बॅकलॉग एन्ट्री, टॅक्स क्लिअरन्स व्हेरिफिकेशन व अप्रुव्हल देऊन शासकीय महस-ुलाची हानी/नुकसान केले जाते असे निवेदन राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद काशिनाथ धुमाळ यांनी परिवहन विभागाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने मा.उपलोकायुक्त कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्याने चौकशीचे सत्र फिरून अखेर दोषी मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला तसेच लिपिक टंकलेखक मयूर हटकर आणि सुहास पवार यांच्यावर पुढील १ वर्षाकरिता वेतन वाढ रोखण्याची कारवाई/ शिक्षा लादण्यात आली आहे, यामुळे परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे.

# जीवनात स्वामींच्या आशीर्वादाने सकारात्मक बदल घडतील अशी अपेक्षा : निलेश शिंदे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीशैल गवंडी : आज पर्यंत क्रीडा क्षेत्रात अतोनात संघर्ष करून जीवन जगलो आहे. संघर्षमय काळात नकारात्मकता ही अनभवलो आहे. पण आज जीवनात स्वामींच्या आशीर्वादाने सकारात्मक बदल घडतील अशी अपेक्षा असल्याचे मनोगत

मुंबई कुर्ला येथील स्व-स्तिक मंडळ क्लब तथा भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड संघाचे माजी खेळाडू आणि प्रशिक्षक, प्रो.कब्बडी लीग (सीझन १ ते ४) बंगाल योद्धा संघाचे व दबंग दिल्ली ५ वा सीझन संघाचे कॅप्टन तसेच बीच गेम २०१० सालाचे सुवर्णपदक विजेता निलेश शिंदे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होऊन दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते प्रथमेश इंगळे यांनी निलेश शिंदे यांचा सपत्निक

श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी निलेश शिंदे बोलत होते. पुढे बोल-ताना निलेश शिंदे यांनी मोठ्या भक्तीभावाने आज श्री स्वामी दर्शन घेतले आहे. स्वामींच्या दर्शनाने शांती आणि समाधान मिळाले आहे. हे समाधान घेऊन वारंवार स्वामींनी आपणास दर्शनाकरीता बोलावून उपकृत करावे अस-ेही मनोगत व्यक्त केले.यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, दर्शन घाटगे, ओंकार महाडिक, तुषार मोरे, धनराज स्वामी, प्रविण शिंदे आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

### रेल्वेच्या धडकेत शेतकऱ्याचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील खारबाव नजीक भिवंडी-वसई रेल्वे मार्गावर झालेल्या दुर्दैवी अपघातात चिंचपाडा येथील रहिवासी शेतकरी चंद्रकांत जाऊ पाचमारे (वय ५५) यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रकांत पाचमारे हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतावर गेले होते. शेतावरून घरी परतत असताना रेल्वे रुळ ओलांडत असताना अच-ानक आलेल्या रेल्वेने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत ते रेल-्वेखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शव विच्छेदनासाठी भिवंडी इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे पुढील तपास संबंधित रेल्वे प्रशासन व पोलिसांकडून सुरू आहे.

## वारंवार नियमभंग करणाऱ्या ऑर्केस्ट्रा-बारवर कडक कारवाई करण्याबाबत कायद्यात दुरुस्ती करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वारंवार नियमभंग करणाऱ्या ऑर्केस्ट्रा-बारवर कडक कारवाई करण्याबाबत कायद्यात लवकरच दुरुस्ती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

राज्यात नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ऑर्केस्ट्रा व डान्सबारविरुद्ध कारवाई करण्याचा मुद्दा आमदार सुभाष देशमुख यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हणाले की, ऑर्केस्ट्राबारच्या ना-वाखाली काही ठिकाणी डान्सबार चालवले जातात. अशा ठिकाणी कारवाई केल्यानंतरही पुन्हा त्याच प्रकारे व्यवसाय सुरु केला जातो. त्यामुळे राज्य शासनाने ठरवले आहे की तीन वेळा नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांचे परव-ाने कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद कायद्यात करण्यात येईल. या अधिवेशनात किंवा पुढील अधिवेशनात यासंदर्भात आवश्यक दुरुस्ती प्रस्तावित केली जाईल.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणा-ले की, या विषयावर सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी निर्णय दिले आहेत. राज्य शास-नाने विविध वेळा कायदे आणि नियम तयार केले, मात्र सर्वोच्च न्यायालयाने काही तरतुदी घटनाबाह्य ठरवल्या. तरीदेखील राज्य शासनाने नव्याने नियम आखले असून त्यानुसार ऑर्केस्ट्रा बार चालवण्यासाठी विशिष्ट जागा, पार्टीशन, अल्कोहोलवरील निर्बंध आदी अटी घालण्यात आल्या असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पनवेल येथील प्रकरणाची तपासणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रश्नाच्या चर्चेत आमदार भास्कर जाधव यांनी सहभाग घेतला.

## खळबळजनक। सासऱ्याचा खून, हल्ला करणाऱ्या जावयाने स्वत:वरही करून घेतले वार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यात आज एक धक्कादायक घटना समोर आली आहे. इंगळगी गावातील शेतात जावयाने सासऱ्यावर प्राणघातक हल्ला केला. धारदार चाकूने वार करत त्यांची हत्या केली. त्यानंतर जावईने स्वतः आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सोलापुरातील रुग्णालयात जावयावर उपचार सुरू आहेत.

घटनेत मृत व्यक्तीचे नाव सिकंदर मुलका शेख असे आहे तर आरोपी जावयाचे नाव सादिक सैफन दफेदार असे आहे. याप्रकरणी वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मयत सिकंदर शेख यांचा मुलगा आणि मुलगी पोलीस खात्यात कार्यरत असल्याची प्राथमिक माहिती मि ळाली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सादिक दफेदार याने शेतात सिकंदर शेख यांच्यावर धारदार चाकूने वार करून त्यांचा खून केला. त्यानंतर आरोपीने स्वतःवरही वार करून घेतल्याची माहिती समोर आली आहे. जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

### माय मराठी

भारत देशाचा, मजबूत ढाचा
गोड मराठी अमुची भाषा
कडी कपारी , हाती तुतारी
आवाज घूमूदे गगनापरी
माय मराठीचा, माय मराठीचा
झेंडा रोऊया शिखरावरी

संतांची भूमी ही आमची
महामानवांच्या विचारांची
माझा शेतकरी घाम गाळूनी
दिवस रात्र ,कष्टकरी
माय मराठीचा, माय मराठीचा
झेंडा रोऊया शिखरावरी

आमच्या मातीचा सुंगंध भारी
आज आकाशी घेतोय भरारी
मराठी साहित्यात, आमचा प्रवास
शब्दांची माल गुंफतो मोत्यापरी
माय मराठीचा, माय मराठीचा
झेंडा रोऊया शिखरावरी

लोककलेचा, मराठी साहित्याचा
अभिमान आम्हा, या महाराष्ट्राचा
मराठी भाषेची , अस्मिता
लखलख करते चंद्रावरी
माय मराठीचा, माय मराठीचा
झेंडा रोऊया शिखरावरी

**कवी- मिलिंद सुरेश जाधव**
**रा. पडघा, भिवंडी**

रांजनोली ग्रामपंचायतीचा पुढाकार; जादूगार महेंद्र सोनावणे यांच्या प्रयोगातून योजनांची प्रभावी मांडणी

# भिवंडीत मुख्यमंत्री गाव समृद्धी पंचायतराज अभियानाची अनोखी जनजागृती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आजच प्लास्टिकला नकार द्या आणि पर्यावरण वाचवण्यासाठी कापडी पिशवीचा स्वीकार करा. असा संदेश जादूच्या माध्यमातून देण्यात आला.

मुख्यमंत्री गाव समृद्धी पंचायतराज अभियान अंतर्गत जनजागृतीसाठी भिवंडी तालुक्यातील रांजनोली ग्रामपंचायतिच्या वती-ने जिल्हा परिषद रांजनोली मराठी शाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध जादूगार महेंद्र सोनावणे (एस. महेंद्रा) यांनी जादू प्रयोगाच्या माध्यमातून अभियानाची माहिती अत्यंत प्रभावी व मनोरंजनात्मक पद्धतीने सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महार-ाज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तसेच विविध महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जादूगार महेंद्र सोना-वणे यांनी आपल्या जादू प्रयोगातून गावाचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छ व सुंदर तसेच प्लास्टिकमुक्त गाव निर्मिती, घनकचरा व्यवस्थापन, ग्रामस्वच्छता उपक्रम, ग्रामसभेद्वारे लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार व प्रोत्साहन निधी, महिला बचत गट, युवक आणि नागरिकांचा विकासातील सहभाग तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्दिष्टांविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोविंद खामकर व साहाय्यक गटविकास अधिकारी इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण तालुक्यात या अभियानाचा प्रचार सातत्याने सुरू आहे. रांजनोली ग्राम पंचायतीचे प्रशासक, पंचायत समि ती ग्रामपंचायत विभागाचे विस्तार अधिकारी इंद्रजित काळे, विस्त-ार अधिकारी राजू भोसले आणि विस्तार अधिकारी सुधाकर सोनावणे यांनी तालुक्यात योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी विशेष परिश्रम घेत-ले आहेत. ग्रामपंचायत अधिकारी विशाल शेलार व ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांच्या पुढाकारातून रांजनोली मराठी शाळेच्या भव्य सभागृहात हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या निमित्त-ाने रांजनोली ग्रामपंचायत हद्दीतील महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले. कोनगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मेश्राम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी महिलांची आरोग्य तपासणी केली. गावातील शेकडो महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

रांजनोली शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनी गाव स्वच्छ ठेवण्याची शपथ घेत स्वच्छतेचा संदेश दिला. विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमानंतर उपस्थितांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

जादू प्रयोगाच्या माध्यमातून योजनांची माहिती मनोरंजनात्मक पद्धतीने दिल्यामुळे ती अधिक प्रभावी ठरल्याची प्रतिक्रिया अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केली. या उपक्रमामुळे गावात विकास आणि स्वच्छतेबाबत सकारात्मक वा-तावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिजामाता उद्यानाच्या कामात कोट्यावधीचा घोटाळा: मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा आंदोलनाचा इशारा

## ...अन्यथा पंढरपूर शहरातील नागरिकांना सोबत घेऊन मनसेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिजामाता उद्यानामध्ये भाविकांसाठी व स्थानिक नागरिकांसाठी एक उत्तम फिरण्याची ठिकाण असून यात जॉगिंग ट्रॅक, आणि मुलांसाठी खेळणी बसवून, नव्याने विकसित प्रमुख पर्यटन म्हणून, नूतनीकरण करण्याचे काम पंढरपूर नगरपालिकेकडून सुरू आहे.

मात्र यामध्ये सुशोभीकरणाच्या नावाखाली झालेली कोट्यावधी रुपयाची कामे नगरपालिकेने अधिकारी आणि ठेकेदार यांच्या मिली बघत करून जनतेच्या पैशाची लूट करून निकृष्ट दर्जाचे काम केले आहे. केले असल्याचे आरोप मनसेने ते दिलीप बापू धोत्रे यांनी यांनी केला आहे. उद्यानाच्या कामात मोठा भ्रष्टाचार केला असल्याने, शासनाच्या गुणवत्ता नियंत्रणांकडून विभागाकडून कामाचा दर्जा तपासून अधिकारी व ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल करून जनतेची पैशाची लूट करणारा कडून पैसे वसूल करण्यात यावे अन्यथा पंढरपूर शहरातील नागरिकांना सोबत घेऊन मनसेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा मनसेने ते दिलीप बापू धोत्रे प्रशासनाच्या शासकीय विभागामध्ये मोठी खळबळ उडाली असल्याचे दिसून येत आहे.

पंढरपूर शहरातील जिजामाता उद्यानेच्या मागील एक वर्षापासून सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. या कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी



तरतूद करण्यात आली आहे. मात्र उद्यानातील सर्व कामे निकृष्ट दर्जाचे झाले असून असे मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केल्याने उद्यानाच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर बाब समोर आली आहे.


धोत्रे यांनी रविवारी प्रत्यक्ष जिजामाता उद्यानात भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता त्यावेळी त्यांनी माध्यमाची संवाद साधताना नगरपालिका अधिकाऱ्यांनी ठेकेदार यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

उद्यानामधील लहान मुलांसाठी बसवण्यात आलेली खेळणी व साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे उद्यानाच्या वॉल कंपाऊंडलाही तडे गेले आहेत. दुर्घटना होनेचेही शक्यता निर्माण झाली आहे. सिमेंटचा वापर कमी केल्याने येथे फेवर ब्लॉक व सिमेंटचे तुकडे हाताने उचकटून निघत आहेत. उद्यानात लोन ऐवजी हराळी लावण्यात आली आहे. मध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याने. अधिकाऱ्यांनी ठेकेदारांना मिली भगत करून बिल देण्यात आले. अनेक वर्षापासून नगरपालिकेची सत्ता बोलणाऱ्या श्रेय वादासाठी कामाचे उद्घाटन करण्याचा घाट घातला जात आहे. गांभीर्याने घेऊन शासनाच्या क्वालिटी कंट्रोल विभागाकडून कामाचा दर्जा तपासण्यात यावा याची सखोल चौकशी करून अधिकारी आणि ठेकेदार गुन्हा दाखल करून जनतेच्या पैशाची लूट करणार कडून पैसे वसूल करण्यात यावेय. अन्यथा मनसेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा धोत्रे यांनी दिला आहे.

## कल्याण मुरबाड महागॉवर अपघातात आजोबांच्या वर्ष श्राद्धास आलेल्या तरुणाचा गेला जीव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे म्हारळ : आजोबांच्या वर्षश्राद्धासाठी आलेल्या तरुणाचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने कुटुंबियांना मध्ये शोक कळा पसरली.



वैभव साहेबराव भामरे (२४ ) (नाशिक ,करंजाड )तरुणाचं नाव असून तो वरप येथील मावस भाऊ चंद्रशेखर पवार याच्या कडे आला होता मोटर सायकलने तो साहित्य आणण्यासाठी कल्याण मुरबाड महामार्गावरून बिर्ला गेट मार्ग कडे जात असताना थारवाणी संकुला जवळ म्हारळ पाडा दरम्यान भरधाव येणाऱ्या आयवाच्या धडकेत जागीच वैभव ठार झाला , दरम्यान ग्रामस्थांना मध्ये हळहळ व्यक्त होत असून कुटुंबीयांमध्ये शोक कळा पसरली आहे, अधिक तपास टिटवाळा पोलीस करीत आहेत.

या अपघात मुळे कल्याण मुरबाड महामार्गावरून अवैध रित्या भरधाव जाणाऱ्या अवजड वाहनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून ग्राम स्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

## वंचित बहुजन आघाडीचे ठाणे जिल्हा माजी महासचिव यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे :ठाणे जिल्हा माजी महासचिव सुनील साहेब पगारे यांचा वाढदिवस कल्याण येथे मोठ्या थाटामाटा साजरा करण्यात आला.

सदर प्रसंगी उल्हासनगर शहराच्या वतीने त्यांना शाल व पुष्पहार देऊन त्यांचे स्वागत केले त्यांना पुढील मंगलमय आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सुनील पगारे साहेब हे वंचित बहुजन आघाडी ठाणे जिल्हा महासचिव असताना त्यांनी अखबा ठाणे जिल्हा पिंजून काढला व जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते शहराध्यक्ष यांना बळ देण्याचे काम केले सर्वांना बरोबर घेऊन त्यांचा मानसन्मान करून जिल्ह्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या सुखदुःखामध्ये सामील होणे त्यांचे मनोबल वाढवणे ही कला पगारे साहेब यांच्याकडे नक्कीच आहे म्हणूनच काल जिल्ह्यातील त्यांच्या चाहत्यांनी व जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी एकच गर्दी केली होती.

## लोकसेवा नशा मुक्ती केंद्राच्या माध्यमातून राधेश्याम बंगाळे यांनी सोडवले हजारो तरुणांचे दारूचे व्यसन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सध्या अनेक तरुणाई व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे संसारापासून आपल्या जीवनापासून आपल्या सामाजिक कार्यामधून वेगळे झालेले आहे लग्न कार्यामध्ये व इतर कार्यक्रमांमध्ये तरुणांमध्ये व्यसनाचे विशेषता दारू पिण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे ' काही ठिकाणी तर दारूच्या व्यसनामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

अनेक ठिकाणी दारूमुळे अनेकांना घटस्फोट सुद्धा घ्यावा लागल्याच्या बातम्या आपण पाहिले आहेत ' मात्र सध्याच्या या जमान्यात हजारो नागरिकांचे लोकांचे विशेषता तरुणांचे दारूचे व्यसन साखरखेर्डा येथील नशा मुक्ती केंद्राच्या माध्यमातून सोडवण्याचे काम गेल्या तीन वर्षापासून राधेश्याम बंगाळे हे सातत्याने करीत आहेत ' आयुर्वेद औषधी च्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत अनेकांची दारू सोडवली असून आम्लपित्त इसमगोल मुळव्याध 'पोटाचे विकार वजन कमी करणे केस गळती अर्धांग वायू साखरेची बीमारी वात मुंग्या शिरा अशा विविध समस्यावर त्यांचे आयुर्वेदिक औषध असरदार ठरत आहे '

अनेकांचे दारू सुटल्याचे फोन त्यांना येत असून खऱ्या अर्थाने साखरखेर्डा परिसरातील वडीलधारी मंडळी असेल व तरुण असेल हे आयुर्वेदिक औषध घेऊन दारू सोडवण्यासाठी येत असतात त्यामुळे अनेकांची दारू सोडण्याचे काम लोकसेवा नशा मुक्त केंद्राच्या माध्यमातून राधेश्याम बंगाळे करत आहेत.

## रांजणी येथील हजरत ख्वाजा बद्रोदिन माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी/हनुमंत पाटुळे/ दि.२५(प्रतिनिधी) कळंब तालुक्यातील रांजणी येथील येथील खॉजा बद्रोद्दीन माध्यमिक विद्यालयात एन. एम. एम. एस. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार विद्यालयाच्या वतीने करण्यात आला होता. यावेळी सोनपारखे श्वेता आश्रुबा,व सय्यद आलविरा नुरमहंमद या गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.कुंभकर्ण बाबासाहेब, गावचे सरपंच श्री.आगरकर राजाभाऊ, वि.वि.कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी चे व्हा.चेअरमन श्री.शेख वाहेद या प्रसंगी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थिनी व पालक श्री.सोनपारखे आश्रुबा, पठाण अन्वर, यांचा सत्कार करण्यात आला. या एन. एम. एम एस. परीक्षेसाठी श्रीमती म्हेत्रे मिरा , श्री.गाडे रंजित, श्री.घोगरे जरिचंद श्री.पाखरे तुकाराम या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी शाळेतील कर्मचारी श्री.पठाण फेरोजखाँ, सोनपारखे अनिल(सेवक), श्रीमती रब्बानी बेगम शेख, यांच्या सह शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सत्ताधारी असलेले भाजपचे जिल्हा अध्यक्षाची दोन मतदारसंघात नाव: जिल्हा परिषद सदस्य रद्द करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भाजपचे सोलापूरचे जिल्हाध्यक्ष नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये विजयी झालेले चेतन सिंह केदार सावंत यांचे दोन मतदारसंघात नाव असल्यामुळे त्यांचे जिल्हा परिषद सदस्य पद रद्द करावी अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष नागरिकांची लागले आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये सांगोला तालुक्यातील चोपडी जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन शेख केदार सावंत विजयी झाले आहेत. त्यांनी सांगोला शहर व ग्रामीण भागात अशा दोन ठिकाणी मतदार यादी मध्ये नाव आहे वास्तविक पाहता लोकप्रतिनिधी ओपिनियन कलम ३१ एकाच ठिकाणी नावावर नोंदणी करता येते. मात्र सावंत यांनी दोन ठिकाणी मतदान नोंदणी केली आहे त्यामुळे त्यामुळे सावंत यांचे जिल्हा परिषद सदस्य रद्द करण्यात यावी अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आर वाय फोटोकडे यांनी दाखल केली आहे. चेतन सिंह केदार सावंत



यांची पत्नी ही यांचे यांचेही पद धोक्यात आलेत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे आता न्यायालय कोणता निर्णय देणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## घोळसगाव मराठी शाळेतील मुलांनी घेतला वनभोजनाचा आनंद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घोळसगाव : आनंददायी शिक्षण या उपक्रमांतर्गत वनभोजन हा सहशालेय उपक्रम आज घोळसगाव जिल्हा परिषद मराठी शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला.

गावातील तरुण प्रगतशील बागायतदार शेतकरी म्हणून आळखले जाणारे अरिफ अब्बासली दिवटे यांच्या शेतामध्ये वनभोजन उपक्रम घेण्यात आला. सकाळी दहा वाजता शाळेतून विद्यार्थ्यांना चालत तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या फळ पिक बागेच्या ठिकाणी नेण्यात आले. तिथे विद्यार्थ्यांना चिक्कू, पेरू, आंबा, नारळ, जांभूळ, आवळा इत्यादी फळ पिकाबद्दल शिक्षकाकडून व बागायतदार शेतकऱ्याकडून माहिती देण्यात आली तसेच त्यासोबत गहू, ज्वारी, ऊस, हरभरा हे पीक देखील प्रत्यक्षात दाखवून विद्यार्थ्यांना झाडांचे, फळांचे आरोग्यासाठी असलेले महत्त्व पटवून सांगण्यात आले.

दिवटे परिवाराच्यावतीने विद्यार्थ्यांना व शिक्षकांना अप्रतिम असे स्वादिष्ट जेवणाचे सोय देखील केली होती. सर्व विद्यार्थी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य बागायतदार शेतकरी सर्व मंडळी एकत्रित बसून जेवणाचा आस्वाद घेतला तसेच मुलांना पेरू, चिक्कू देखील खाण्यास देण्यात आले सर्व विद्यार्थीनी नृत्य, गायन, फुगे फोडणे, गमतीदार खेळ असे विविध खेळ खेळून तसेच त्यांचे विविध कलागुण सादर करून दाखवले विद्यार्थ्याकडून कविता,प्रार्थना विनोद, कथा इत्यादी कला गुण सादर करण्यात आले. विशेष म्हणजे गेल्या वर्षी देखील त्यांच्या शेतामध्ये वनभोजनाचे आयोजन केले होते गेल्या वर्षी दिवटे यांनी शब्द दिल्याप्रमाणे ह स्विमिंग फुल बांधले सुद्धा त्यामुळे आज विदयार्थ्यांनी पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला. शेतमालक अब्बासअली दिवटे यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या सोयी सुविधा बद्दल त्यांचे आभार शाळेचे मुख्याध्यापक मनोज माने यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानण्यात आले. वनभोजन हा कार्यक्रम यशस्वीरित्य पार पाडण्यासाठी रामेश्वर दरेकर, अशोक ठाकर, अमोल गुंजोटे, मुरलीधर वागदकर, घेडके मॅडम यांचे योगदान लाभले.

### गटविकास अधिकारी पंचायत समिती कळंब यांना देण्यात आले निवेदन

## कळंब पंचायत समिती कार्यालयासमोर समोर जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय अधिकारी कर्मचारी संघटनेचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील पंचायत समिती कार्यालयासमोर जय महाराष्ट्र शासकीय निम शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य यांचे दि.१६ फेब्रुवारी २०२६ पासून असहकार आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्र शासनाच्याअंतर्गत प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या सर्व ४२६ विभागातील लिपिक संवर्गाच्या चौथ्या वेतन आयोगापासून , वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारित वेदर श्रेणी लागू करणेसाठी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनात अनेक मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत या मध्ये वेतन त्रुटी दूर झालीच पाहिजे, पदोन्नती स्तर कमी झाला पाहिजे,जुनी पेन्शन योजना जशास तशी लागू झाली पाहिजे, याकरिता दिनांक १६फेब्रुवारी २०२६ पासून असहकार आंदोलन चालू होते. परंतु दि.२३फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामध्ये जय



महाराष्ट्र राज्य शासकीय निम शासकीय अधिकारी कर्मचारी संघटना शाखा कळंब अध्यक्ष श्री आकाश विभुते, उपाध्यक्ष प्रदीप कुडदे, सचिव प्रवीण हजारे,सुहास जावळे, उपसचिव प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब शिंदे ,तालुका संपर्कप्रमुख कुंदन ठोकळ, तालुका संघटक अतुल यादव, सलीम बेग, महिला उपाध्यक्ष श्रीमती दांडेगावकर, महिला प्रसिद्धीप्रमुख श्रीमती बनसोडे, तसेच सर्व , पदाधिकारी सदस्य या काम बंद आंदोलनांमध्ये सहभागी आहेत. काम बंद आंदोलनाचे निवेदन गटविकास अधिकारी पंचायत समिती कळंब यांना देण्यात आलेले असुन त्याच्या प्रती मा. उपविभागीय अधिकारी कळंब, मा. तहसीलदार तहसील कार्यालय कळंब, मा. उपनिरीक्षक पोलीस स्टेशन कळंब यांना देण्यात आल्या आहेत. शासनाने लवकरात लवकर सदीरील मागण्या मान्य कराव्या अशी मागणी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आमदार समाधानदादा आवताडे यांनी पीएम किसान व नमो शेतकरी योजनेतील पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी विधानभवनात उठवला आवाज



## मतदारसंघातील पात्र शेतकऱ्यांचा प्रश्न आ. आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विधानभवन, मुंबई : देशातील करोडो शेतकऱ्यांना दिलासा देणारी 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी' आणि राज्यातील 'नमो शेतकरी महासन्मान निधी' या योजनांपासून वंचित राहिलेल्या राज्यातील तसेच पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील पात्र शेतकऱ्यांचा प्रश्न आमदार समाधानदादा आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला.

पी.एम. किसान सन्मान निधी योजनेची यादी राज्य शासनाच्या 'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेसाठीही वापरली जाते. त्यामुळे केंद्राच्या यादीतील त्रुटींमुळे अनेक पात्र शेतकरी राज्य शासनाच्या योजनेपासूनही वंचित राहत आहेत. एकाच वेळी दोन्ही योजनांचा लाभ न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा निधी मिळावा, ही भूमिका सभागृहात मांडली.

खरंतर केंद्र सरकारकडून १ फेब्रुवारी २०१९ ही नोंदणीची अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती. सात वर्षे उलटूनही या निकषात बदल न झाल्याने २०१९ नंतर सातबारावर नाव नोंद झालेल्या नव्या पात्र शेतकऱ्यांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. अनेक कुटुंबांमध्ये वडिलांच्या हयातीतच कायदेशीर वाटणीद्वारे जमीन मुलांच्या नावावर होते; मात्र या तारखेच्या अटीमुळे असे नवे शेतकरी अपात्र ठरतात. तसेच वारसहक्काने जमीन मिळालेल्या लाभार्थ्यांनाही अर्ज प्रक्रियेत अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

एकट्या मंगळवेढा तालुक्यातून डिसेंबर २०२४ मध्ये १९८९ प्रस्ताव पाठविण्यात आले, त्यापैकी ४०२ प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत. डिसेंबर २०२५ पासून संबंधित पोर्टल बंद असल्याचे स्थानिक ई-सेवा केंद्रांकडून सांगितले जात आहे. सध्या नोंदणी केलेल्या अर्जांच्या छाननी व मंजुरीचे अधिकार राज्यस्तरावर केंद्रीत असल्याने स्थानिक पातळीवर प्रकरणांचा निपटारा होत नाही. तसेच निधी वाटपाची यादी तालुकास्तरावर उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना 'निधी जमा झाला की नाही' याची माहिती मिळविण्यासाठी वारंवार सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

या सर्व मुद्द्यांवर कृषिमंत्री मा.श्री. दत्तात्रय भरणे यांनी सकारात्मक भूमिका घेत सोलापूर जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या दोन्ही योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. १ फेब्रुवारी २०१९ नंतर शेती नोंद झालेल्या नव्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून संबंधित निकषांमध्ये बदल करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

यासोबतच शेतकरीहिताला प्राधान्य देणारे हे सरकार आपल्या भावना आणि प्रश्नांची गांभीर्याने दखल घेऊन लवकरच संयुक्त बैठक आयोजित करून योग्य तो निर्णय घेईल, अशी ठोस ग्वाहीही यावेळी दिली.

---

# सिंदखेड राजा मुद्रांक विक्रेत्यांच्या कडुन होतोय सर्वसामान्य जनतेला नाहक मानसिक व आर्थिक त्रास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे. / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा : येथील खरेदी मुद्रांक विशेष कार्यकारी अधिकारी विक्रेते यांच्या कडुन स्टॅम व स्टॅप खरेदी धारक यांना स्टॅम्प तिकीटाचे दुप्पट पैसे मोजावे लागतात तर काही स्टम्प विक्रेते त्यांचे जवळ स्टॅम असुन देखिल ते काही स्टॅम्प खरेदी धारकास वाजवी पैसे मिळावे या करता सरळ स्टॅम्प नाही दुसरीकडे बघा तिथे गेल्यावरती ही परत तीच बोंब एकण्यास मिळते तिकीट नाही म्हणून सांगतात त्यामुळे स्टॅम्प खरेदी धारकास नाहक आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे तरी संबंधी वरिष्ठांनी सदर प्रकरणाची दखल घेवून सदर स्टॅम्प विक्रते तिकीट विक्रेत यांची सखोल चौकशी करून त्याच्यावर कडक कार्यवाही करून त्यांचे परवाना तात्काळ रद्द करण्यात यावा करावी अशी लेखी स्वरूपाची तक्रार गजानन कहाळे (पत्रकार) आडगाव राजा यांनी दिनांक २४ फेबुवारी रोजी मा. उपकोषागार अधिकारी व दुय्यम निबंधक अधिकारी साहेब सिंदखेड राजा व माननीय तहसीलदार तथा दंडाधिकारी साहेब तहसिल कार्यालय सिंदखेड राजा यांच्या कडे तक्रार केली असून या तक्रारीत बबन सरकटे, दिपक इंगळे,दिलीप साजने इ. नागरिकांच्या स्वाक्षरी आहे सदर स्टम्प विक्रते यांना संबंधीत वरीष्ठ तर पाठीशी घालत नाहीत ना अशि उलट सुलट चर्चा परीसरात दबक आवाजात आल्याच ऐकु येत आहे तरी वरिष्ठांनी या प्रकरणाकडे तात्काळ लक्ष देण्याची अत्यंत जरूरीची गरज निर्माण झाली असून नक्कीच वरिष्ठ या प्रकरणा त काय कारवाई करणार या कडे तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचे लक्ष वेधले आहे.



**वरिष्ठ अधिकारी सर्वसामान्य जनतेची लूट थांबऊन दोषीवरती कारवाई करणार का.?**

---

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्काराचे थाटात वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज शंकरनगर येथे विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट मराठी साहित्य परिषद शाखा अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात सहकार महर्षीशंकरराव मोहिते पाटील साहित्य पुरस्कार'डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. सदानंद देशमुख, नारायण सुमंत, यांना माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.



शंकर नगर येथील उदय सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण समारंभाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, आ. रणजीत सिंह मोहिते पाटील, नगराध्यक्ष रेश्मा आडगळे, विश्वजीत सिंह मोहिते पाटील, विश्वस्त नितीन खराडे, चंद्रकांत कुंभार, डॉ. विश्वनाथ आव्हाड, श्रीकांत राऊत, राजेंद्र काकडे, शहनाज शेख, वसुंधरा देवडीकर, उपस्थित होते.

प्रारंभी प्रास्ताविकात स्वरूपा राणी मोहिते पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचा परिचय करून दिला, यावेळी पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या वतीने पुरस्कार स्वीकारणाऱ्या आसावरी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

---

# काकासाहेबनगर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक, के के वाघ फाऊंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाऊंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांचे संयुक्त विद्यमाने कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या स्मृती प्रित्यर्थ रविवार, दिनांक १ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजे दरम्यान के के वाघ शैक्षणिक संकुल काकासाहेबनगर (रानवड) ता. निफाड येथे मोफत आरोग्य तपासणी महाशिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात



डॉ. राज नगरकर (कॅन्सर रोबोटिक शस्त्रक्रिया तज्ज्ञ), डॉ. प्राची पवार (नेत्र तपासणी तज्ज्ञ), इंदोरवाला हॉस्पिटल तर्फे कान-नाक-घसा तज्ज्ञ, डॉ. स्वनील साखला (फुफ्फुस-छातीविकार तज्ज्ञ), डॉ. संदीप पानगव्हाणे (अस्थिविकार तज्ज्ञ), डॉ विकास कदम (मूत्रसंस्था विकार तज्ज्ञ), डॉ. निनाद थोरात (मेंदू विकार तज्ज्ञ), डॉ प्रशांत बागुल आणि डॉ. पूजा कदम (स्त्रीविकार तज्ज्ञ), डॉ. अमित बोरसे (दंतविकार तज्ज्ञ), डॉ. अतुल पाटील (हृदयरोग तज्ज्ञ), डॉ. गौरव कुलकर्णी (पोट व यकृत विकार तज्ज्ञ), डॉ. रोहन देव (फिजिओथेरपिस्ट), डॉ. श्वेता मुर्तडक (जनरल फिजीशियन) हे नामांकीत डॉक्टर तपासणी करणार आहेत.

यावेळी रानवड, पालखेड, कुंभारी, दावचवाडी, लोणवाडी, आहेरगाव, शिरवाडे वणी, गोरठाण, खडकजांब, रेडगाव, नांदूर खुर्द, वावी, सावरगाव, सारोळे खुर्द, नांदुर्डी, देवपूर, पंचकेश्वर, ब्राम्हणगाव, खडक माळेगाव, खाणगाव, देवरगाव, पिंपळद, हिरापूर या गावातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी केलेले आहे.

तरी नाव नागरीकांनी संदीप शिंदे (९०२१९१९४६७) व ज्ञानेश्वर गवळी (९३५६७९७८९९) यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी.

---

# उगाव शाळेच्या विद्यार्थ्यांचे एनएमएस परीक्षेमध्ये घवघवीत यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्याय उगावच्या विद्यार्थ्यांचे एन एम एस परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र राज्य संचलित आर्थिक दुर्बल घटक (N.M.S.) शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ मध्ये घेण्यात आलेल्या एनएमएस परीक्षेमध्ये विद्यालयातील दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता या मध्ये सोनवणे आराध्या विलास, बिरार वेदिका दत्तात्रय, जाधव अनन्या गोकुळ, पारधे अनुष्का बापू, गांगुर्डे अनुष्का रमेश, शिरसाट साईराम रवींद्र, गांगुर्डे कल्याणी रावसाहेब, जेवू घाले जान्हवी नामदेव, जाधव श्रेया नरहरी, यांनी यश संपादन करून संस्थेचे, शाळेचे व गावाचा नावलौकिक वाढवीला असून या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे ज्येष्ठ मार्गदर्शक दीपकभाऊ जोंधळे सचिव दत्ताभाऊ जोंधळे विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी पर्यवेक्षक नंदाराम ढिकले व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक केले.

वाबळे आर.एस, ढोमसेपाटील मॅडम, गावंड , मातेरे या शिक्षकांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

---

**गट शिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे यांच्यावर दलित अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यासाठी अनेक सामाजिक संघटनेचे मागणी**

# मागासवर्गीय शिक्षक यांच्यावर अन्याय करणाऱ्या शिक्षण अधिकारी अरबाळे याना त्वरित निलंबित करून कार्यवाही करण्यासाठी उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुका पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे हे तालुक्यातील मागासवर्गीय शिक्षकांना जाणीवपूर्वक जातीच्या द्वेषातून मानसिक त्रास देत असल्याने मागासवर्गीय शिक्षक संघटनेकडून जिल्हा परिषद गेट समोर उपोषण सुरू करण्यात आले आहे

वादग्रस्त प्रभारी गट शिक्षण अधिकारी यांनी यापूर्वी मागासवर्गीय महिला शिक्षिका व मागासवर्गीय शिक्षक तपासणीच्या नावाखाली त्रास देण्याचे काम केले आहे याबाबत वरिष्ठ पातळीवर तक्रार दाखल आहे व उत्कृष्ट शिक्षक म्हणून ज्यांना तालुक्यात बघतात असे मागासवर्गीय शिक्षक महानतेश कट्टीमनी यांच्यावर खोटी आरोप करून खोटी रिपोर्ट देऊन त्रास देण्याचे काम करीत आहेत याबाबत अनु जाती आयोग यांच्याकडे देखील तक्रार दाखल करण्यात आले आहेत

अक्कलकोट तालुक्यामध्ये सप्टेंबर २०२४ मध्ये शिक्षकांची प्रतिनियुक्ती केले होते, त्या प्रतिनिधी बद्दल शिक्षक नाराज झाले नाराज झालेले शिक्षकांनी शिक्षक संघटने कडे तक्रारी केले त्या तक्रारीचे दखल घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडे मागासवर्गीय शिक्षक संघटना प्रति नियुक्तीचे चौकशीसाठी तक्रार केले त्यानंतर माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी स्त्री सदस्य समिती चौकशी साठी घटीत केले त्या समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हा नियोजन शिक्षण पठारे मॅडम यांनी चौकशी केली त्या चौकशीचे अहवाल माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांना १६ जानेवारी २०२५ रोजी सुपूर्द करण्यात आले मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी अहवाल सोपवून एक वर्ष पूर्ण झाले त्या फायलीवर निर्णय घेऊन सुद्धा फाईल शिक्षण विभागाकडे पाठवण्यास एक वर्षापासून विलंब होत आहे .

**सदर प्रकरणी अनेक सामाजिक संघटनेने दखल घेऊन गट शिक्षण अधिकारी प्रशांत अरबाळे यांच्यावर दलित अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये मागासवर्गीय शिक्षक याना जाणीवपूर्वक मानसिक त्रास व सार्वजनिक ठिकाणी अपमान जनक वागणूक दिल्याबद्दल त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत सामाजिक न्याय मंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आल्याची माहिती आहे**

सदर प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांनी शासनाला सुद्धा चुकीचे माहिती देऊन उपशिक्षण अधिकारी परीक्षा पास झाले होते त्यांचे माहिती चौकशी केल्यानंतर चुकीचा आढळून आल्याने त्यांचे नियुक्ती रद्द केले व तसेच यांच्यावर महिला शिक्षिक यांचा सुद्धा अनेक तक्रारी आहेत, आणि ज्या शाळेत भेटीला जातात त्या शाळेतील शेरा बुक व आर्थिक व्यवहाराचे फाईल सोबत घेऊन येतात दोन-तीन दिवसांनी त्या फायलीवर तोडगा काढून ते परत पोच करतात असे शिक्षकांमधून ऐकू येत आहे,

असे नियमबाह्य वागणूक करून शिक्षणाचे गुणवत्ता ढासळणारे व तालुक्यातील अनेक शाळा कुलूप ठोकणारे आणि अनेक शाळेत विद्युत कनेक्शन नाही कितीतरी शाळेत पाणी व्यवस्था नाही आणि स्वच्छतागृह नादुरुस्त आहे असे शाळेचा दुरावस्था कडे लक्ष न देता शिक्षकांना मानसिक त्रास देण्याकडे त्यांचे लक्ष आहे. असे प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांना निलंबित करून विभागीय चौकशी लावावे अन्यथा पुढील येणारे आठवड्यात मुंबई येथील मंत्रालयासमोर उपोषण करणार असल्याची माहिती अन्याय ग्रस्त शिक्षक कट्टीमनी यांनी सांगितले.

